जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
11 OCT 2025
पुढारी

# शिवाजी विद्यापीठाच्या प्रभारी कुलगुरूपदी डॉ. सुरेश गोसावी

## कुलपती तथा राज्यपाल कार्यालयाकडून घोषणा

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**



कुलपती तथा राज्यपाल कार्यालयाकडून अखेर चौथ्या दिवशी शिवाजी विद्यापीठाच्या प्रभारी कुलगुरूपदी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी यांची निवड केली. शनिवारी (दि. ११) सकाळी कुलगुरू डॉ. गोसावी प्रभारी कुलगुरूपदाचा कार्यभार स्वीकारणार आहेत.

डॉ. गोसावी यांची सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे कुलगुरूपदी ६ जून २०२३ मध्ये नियुक्ती झाली. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात विद्यापीठाच्या भौतिकशास्त्र विभागात प्राध्यापक व पर्यावरणशास्त्र विभागाचे विभागप्रमुख म्हणून कार्यरत होते. डॉ. गोसावी यांचे प्राथमिक शिक्षण धरणगाव तालुक्यातील चांदसर येथे झाले. यावल तालुक्यातील किनगाव येथून त्यांनी दहावीचे शिक्षण पूर्ण केले. त्यांनी जळगावातील एम.जे. महाविद्यालयातून अकरावी, बारावी सायन्स पूर्ण केले. नूतन मराठा महाविद्यालयातून त्यांनी बी.एसस्सी. इलेक्ट्रॉनिक्स विषयातून पदवी पूर्ण केली. त्यानंतर पुणे विद्यापीठात उच्च शिक्षण घेतले. याच विद्यापीठात प्राध्यापक ते कुलगुरूपदापर्यंत झेप घेतली. त्यांच्या शैक्षणिक आणि प्रशासकीय कार्याची दखल घेऊन राज्यपालांनी शिवाजी विद्यापीठाचा प्रभारी कुलगुरूपदाचा अतिरिक्त कार्यभार दिला आहे. यासंदर्भातील पत्र राज्यपाल कार्यालयाकडून शिवाजी विद्यापीठ प्रशासनास शुक्रवारी सायंकाळी प्राप्त झाले आहे.

> शिवाजी विद्यापीठाच्या कुलगुरूपदाचा अतिरिक्त पदभार स्वीकारण्याचे निर्देश दिल्याबद्दल कुलपती यांचे आभार मानतो. त्यांच्या निर्देशानुसार तातडीने कार्यवाही करीत असून कार्यभार स्वीकारणार आहे. विद्यापीठाचा गौरवशाली वारसा (परंपरा) वृद्धिंगत करण्यासाठी व तो अधिक सक्षम करण्यासाठी प्रयत्नशील राहीन.
>
> **-डॉ. सुरेश गोसावी,** कुलगुरू, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
11 OCT 2025
सकाळ

# प्रभारी कुलगुरुपदी डॉ. सुरेश गोसावी

## कार्यभार आज स्वीकारणार

■ सकाळ वृत्तसेवा


प्रा. डॉ. सुरेश गोसावी



कोल्हापूर, ता. १० : क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. डॉ. सुरेश गोसावी यांची आज शिवाजी विद्यापीठाच्या प्रभारी कुलगुरुपदी नियुक्ती झाली. कुलपती तथा राज्यपाल कार्यालयाने त्यांच्याकडे अतिरिक्त कार्यभार सोपविण्याबाबतचा आदेश आज काढला आहे. डॉ. गोसावी उद्या (ता. ११) कार्यभार स्वीकारणार आहेत.

कुलगुरू डॉ. गोसावी यांचे मूळ गाव जळगाव तालुक्यातील धामणगाव असून, ते भौतिकशास्त्राचे प्राध्यापक आहेत. त्यांची जून २०२३ मध्ये पुणे विद्यापीठाच्या कुलगुरुपदी

पान ७ वर ›

# प्रभारी कुलगुरुपदी डॉ. सुरेश गोसावी

› पान १ वरून

नियुक्ती झाली आहे. त्यांनी डिसेंबर २०२३ ते जानेवारी २०२४ दरम्यान डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या प्रभारी कुलगुरुपदाची जबाबदारी सांभाळली आहे. शिवाजी विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांचा कार्यकाळ संपल्यानंतर पुणे विद्यापीठाचे तत्कालीन कुलगुरू डॉ. नितीन करमळकर यांच्याकडे प्रभारी कुलगुरू म्हणून जबाबदारी होती. त्यानंतर आता कुलगुरू डॉ. गोसावी यांच्याकडे अतिरिक्त कार्यभार सोपविण्यात आला आहे. त्यामुळे पुणे विद्यापीठाला शिवाजी विद्यापीठाच्या प्रभारी कुलगुरुपदाची जबाबदारी सांभाळण्याची दुसऱ्यांदा संधी मिळाली आहे.

दरम्यान, मावळते कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांच्यासह चार अधिष्ठातांचा कार्यकाळ सहा ऑक्टोबर रोजी संपला. त्यादिवशी किंवा दुसऱ्या दिवशी प्रभारी कुलगुरूंची नियुक्ती होणे अपेक्षित होते; मात्र, काही तांत्रिक कारणांमुळे ते शक्य झाले नाही. तीन दिवस विद्यापीठाचे कामकाज कुलगुरू, प्र-कुलगुरूंविना सुरू होते. त्यावर आमदार सतेज पाटील, युवा सेनेचे (ठाकरे गट) पदाधिकारी, कार्यकर्त्यांनी नाराजी व्यक्त करत प्रभारी कुलगुरूंची नियुक्ती करण्याची मागणी केली होती.

> शिवाजी विद्यापीठाच्या कुलगुरूपदाचा अतिरिक्त पदभार स्वीकारण्याचे निर्देश दिल्याबद्दल मा. कुलपती (महाराष्ट्राचे राज्यपाल) यांचा मनःपूर्वक मी आभारी आहे. या निर्देशानुसार मी तातडीने कार्यवाही सुरू करत असून, विद्यापीठाचा गौरवशाली वारसा (परंपरा) वृद्धिंगत करण्यासाठी आणि तो अधिक सक्षम करण्यासाठी प्रयत्नशील राहीन.
>
> - डॉ. सुरेश गोसावी, कुलगुरू


जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
11 OCT 2025
पुण्यनगरी

# शिवाजी विद्यापीठ प्रभारी कुलगुरुपदी डॉ. गोसावी

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांचा पाच वर्षांचा कार्यकाल सोमवारी संपला. त्यानंतर चार दिवसांनी शुक्रवारी रिक्त पदाचा कार्यभार सावित्रीबाई फुले विद्यापीठ, पुणेचे कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी यांच्याकडे दिला आहे.

राज्यपाल तथा कुलपतींनी याबाबतची घोषणा केली. विद्यापीठाच्या कुलगुरुपदाची निवड यापूर्वीच होणे आवश्यक होते; परंतु राज्यपालांनी देशाच्या उपराष्ट्रपतीपदाच्या निवडणुकीसाठी अर्ज भरल्याने



शिवाजी विद्यापीठ कुलगुरुपदाची निवड रखडली. त्यामुळे प्रभारी कुलगुरुपदी कोणाची तरी निवड केली जाणार, हे निश्चित होते. त्यानुसार शुक्रवारी राज्यपाल तथा कुलपतींनी डॉ. गोसावी यांच्याकडे विद्यापीठाच्या प्रभारी कुलगुरुपदाचा कार्यभार दिल्याची घोषणा केली.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
11 OCT 2025
लोकसत्ता

# प्रभारी कुलगुरूपदाचा कार्यभार डॉ. सुरेश गोसावी यांनी स्वीकारला



**लोकसत्ता विशेष प्रतिनिधी**

**कोल्हापूर :** सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी यांनी शनिवारी शिवाजी विद्यापीठाच्या प्रभारी कुलगुरूपदाचा कार्यभार स्वीकारला.

सुसंवाद, विश्वास आणि पारदर्शकता या मूल्यांवर आधारित कार्य करून शिवाजी विद्यापीठाचा लौकिक वृद्धिंगत करण्यासाठी सर्वजण मिळून प्रयत्न करू या, असे आवाहन शिवाजी विद्यापीठाचे प्रभारी कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी यांनी यावेळी उपस्थित अधिकार मंडळांचे सदस्य, शिक्षक आणि अधिकारी यांना संबोधित करताना केले.

कुलगुरू डॉ. गोसावी यांनी विद्यापीठाच्या प्रांगणातील छत्रपती शिवाजी महाराज यांच्या अश्वारुढ पुतळ्यास अभिवादन करून मुख्य प्रशासकीय इमारतीमध्ये प्रवेश केला. त्यानंतर कुलगुरू दालनामध्ये प्रभारी कुलगुरूपदाचा कार्यभार स्वीकारला. यावेळी त्यांच्यासमवेत पत्नी अर्चना गोसावी याही उपस्थित होत्या.

कार्यभार स्वीकारल्यानंतर कुलगुरू डॉ. गोसावी यांचे विद्यापीठ प्रशासनाच्या वतीने व्यवस्थापन परिषद सभागृहात औपचारिक स्वागत करण्यात आले. कुलसचिव डॉ. विलास शिंदे यांच्या हस्ते शाल, पुष्पगुच्छ आणि ग्रंथभेट देऊन कुलगुरूंचे सपत्नीक स्वागत करण्यात आले.


जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
11 OCT 2025
लोकमत

# शिवाजी विद्यापीठाच्या प्रभारी कुलगुरुपदी डॉ. सुरेश गोसावी

## आज स्वीकारणार पदभार

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या प्रभारी कुलगुरुपदी अखेर क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे कुलगुरू डॉ.सुरेश गोसावी यांची शुक्रवारी नियुक्ती करण्यात आली. राजभवन कार्यालयाकडून शुक्रवारी त्यांच्या नियुक्तीचा आदेश काढण्यात आला. गेल्या चार दिवसांपासून कुलगुरुविना असलेल्या शिवाजी विद्यापीठाला डॉ.गोसावी यांच्या रूपाने प्रभारी कुलगुरू मिळाले आहेत. आज शनिवारी डॉ.गोसावी प्रभारी कुलगुरुपदाचा कार्यभार स्वीकारणार आहेत.



माजी कुलगुरू डॉ.डी.टी शिर्के यांचा ६ ऑक्टोबरला कुलगुरुपदाचा कार्यकाळ संपल्याने, त्याच दिवशी प्रभारी कुलगुरूंची नियुक्ती होणे अपेक्षित होते. मात्र, राजभवनाकडून कार्यवाही न झाल्याने विद्यापीठाच्या ६३ वर्षांच्या इतिहासात पहिल्यांदाच विद्यापीठ कुलगुरुविना राहिले.

माजी प्र.कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील यांचाही कार्यकाळ ६ ऑक्टोबरलाच संपला. त्यामुळे प्रभारी कुलगुरुपद कुणाकडे जाते याची उत्सुकता होती. अखेर शुक्रवारी राजभवनाने ही प्रतीक्षा संपवली. डॉ.गोसावी हे भौतिकशास्त्राचे प्राध्यापक आहेत.

जून २०२३ मध्ये त्यांची पुणे विद्यापीठाच्या कुलगुरुपदी नियुक्ती झाली आहे. डॉ.गोसावी मूळचे जळगावचे आहेत. पुणे विद्यापीठात उच्चशिक्षण घेतले. याच विद्यापीठात प्राध्यापक ते कुलगुरुपदापर्यंत त्यांनी मजल मारली.

> शिवाजी विद्यापीठाचा गौरवशाली वारसा (परंपरा) वृद्धिंगत करण्यासाठी प्रयत्नशील राहीन.
>
> **डॉ. सुरेश गोसावी, प्रभारी कुलगुरू, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर**

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
11 OCT 2025
सकाळ



कोल्हापूर : येथील शिवाजी विद्यापीठात आयोजित १७ व्या राष्ट्रीय युवा संसद स्पर्धेत सहभागी झालेले विद्यार्थी-विद्यार्थिनी.

# राष्ट्रीय युवा संसद स्पर्धा विद्यापीठात उत्साहात

कोल्हापूर, ता. १० : शिवाजी विद्यापीठात आज केंद्रीय संसदीय कार्य मंत्रालयातर्फे आयोजित १७ वी राष्ट्रीय युवा संसद स्पर्धा उत्साहात झाली.

स्पर्धेचे उद्घाटन कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी स्पर्धेचे परीक्षक कोलकाता (पश्चिम बंगाल) येथील राज्यसभेचे माजी खासदार ब्रतीन सेनगुप्ता, केंद्रीय संसदीय कार्य मंत्रालयाच्या युवा संसद उपक्रमाचे संचालक ए. बी. आचार्य, पुणे येथील श्री शाहू मंदिर महाविद्यालयाच्या राज्यशास्त्र विभागप्रमुख डॉ. वैशाली पवार प्रमुख उपस्थित होते.

विद्यार्थ्यांना संसदीय कार्यप्रणाली अवगत होण्याच्या दृष्टीने युवा संसद हा उपक्रम महत्त्वाची भूमिका बजावत असल्याचे डॉ. शिंदे यांनी सांगितले. पूर्वी आंदोलने हा संसदीय राजकारणात प्रवेश करण्याचा एक महत्त्वाचा मार्ग होता. अलीकडे मात्र हा मार्ग आक्रसत चाललेला आहे. तथापि, संसदीय कार्यप्रणालीचे यथायोग्य आकलन असणाऱ्यांसाठी येथे मोठा अवकाश उपलब्ध आहे. त्यादृष्टीने युवा संसद हा उपक्रम महत्त्वाचा असल्याचे त्यांनी सांगितले. डॉ. प्रल्हाद माने यांनी स्वागत केले. विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. तानाजी चौगुले यांनी आभार मानले. डॉ. संतोष सुतार, कविता वड्राळे, सुखदेव उंदरे, आकाश ब्राह्मणे यांनी स्पर्धेचे संयोजन केले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
11 OCT 2025
पुण्यनगरी

# संसदीय कार्यप्रणाली माहितीसाठी युवा संसद महत्त्वाची

## डॉ. विलास शिंदे; विद्यापीठात १७ वी राष्ट्रीय युवा संसद स्पर्धा उत्साहात

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

विद्यार्थ्यांना संसदीय कार्यप्रणाली अवगत होण्याच्या दृष्टीने युवा संसद हा उपक्रम अत्यंत महत्त्वाची भूमिका बजावत आहे, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. विलास शिंदे यांनी केले. शिवाजी विद्यापीठात केंद्रीय संसदीय कार्य मंत्रालयातर्फे आयोजित १७ वी राष्ट्रीय युवा संसद स्पर्धा (२०२४-२५) उत्साहात झाली. स्पर्धेच्या उद्घाटन समारंभात अध्यक्षस्थानावरून डॉ. शिंदे बोलत होते.



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात आयोजित १७ व्या राष्ट्रीय युवा संसद स्पर्धेत सहभागी झालेले विद्यार्थी-विद्यार्थिनी.

डॉ. शिंदे म्हणाले, पूर्वी आंदोलने हा संसदीय राजकारणात प्रवेश करण्याचा एक महत्त्वाचा मार्ग होता. अलीकडे मात्र हा मार्ग आक्रसत चाललेला आहे. तथापि, संसदीय कार्यप्रणालीचे यथायोग्य आकलन असणाऱ्यांसाठी येथे मोठा अवकाश उपलब्ध आहे. त्या दृष्टीने युवा संसद हा उपक्रम अतिशय महत्त्वाचा आहे.

परीक्षक म्हणून कोलकाता (पश्चिम बंगाल) येथील राज्यसभेचे माजी खासदार ब्रतीन सेनगुप्ता, केंद्रीय संसदीय कार्य मंत्रालयाच्या युवा संसद उपक्रमाचे संचालक ए. बी. आचार्य आणि पुणे येथील श्री शाहू मंदिर महाविद्यालयाच्या राज्यशास्त्र विभागप्रमुख डॉ. वैशाली पवार हे उपस्थित होते. स्पर्धा उपक्रमाचे समन्वयक डॉ. प्रल्हाद माने यांनी प्रास्ताविक केले. विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. तानाजी चौगुले यांनी आभार मानले. स्पर्धा यशस्वी होण्यासाठी डॉ. संतोष सुतार, डॉ. कविता वड्राळे, डॉ. सुखदेव उंदरे, आकाश ब्राह्मणे यांनी काम पाहिले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
11 OCT 2025
सकाळ

# अहिंसेच्या मार्गाने सत्ताबदल होऊ शकतो

## डॉ. अशोक चौसाळकर : विद्यापीठातील दूरशिक्षण केंद्रातर्फे व्याख्यान

■ सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. १० : 'महात्मा गांधी यांचा अहिंसा हा मानवजातीच्या दृष्टीने सर्वांत मोठा धर्म आहे. सत्ताबदल अहिंसेच्या मार्गाने होऊ शकतो', असे प्रतिपादन ज्येष्ठ विचारवंत डॉ. अशोक चौसाळकर यांनी केले.



डॉ. अशोक चौसाळकर

शिवाजी विद्यापीठाच्या दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र आणि गांधी अभ्यास केंद्रातर्फे महात्मा गांधी यांची जयंती व विश्व अहिंसा दिनानिमित्त आयोजित 'लोकशाही आणि अहिंसा' या विषयावरील व्याख्यानात ते प्रमुख वक्ते म्हणून बोलत होते. अध्यक्षस्थानी उपकुलसचिव व्ही. बी. शिंदे होते.

डॉ. चौसाळकर म्हणाले, 'अहिंसा हा सर्वश्रेष्ठ धर्म आहे. मानवजातीने त्याचा स्वीकार केला पाहिजे. अहिंसेची परंपरा महात्मा गांधी यांनी पुढे नेली. ते लोकशाहीचे मोठे पुरस्कर्ते होते. महात्मा गांधींना विकेंद्रित लोकशाही अभिप्रेत होती.'

डॉ. सचिन भोसले यांनी स्वागत केले. डॉ. सुशांत माने यांनी परिचय करून दिला. डॉ. नितीन रणदिवे यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. सूर्यकांत गायकवाड यांनी आभार मानले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
11 OCT 2025
सकाळ

# प्राकृत मराठीचा इतिहास नव्याने लिहिणे गरजेचे

## डॉ. गोमटेश्वर पाटील : शिवाजी विद्यापीठात मराठी भाषा सप्ताह

कोल्हापूर, ता. १० : 'महाराष्ट्री अपभ्रंशातून मराठीचा पूर्वइतिहास सापडतो. या महाराष्ट्री अपभ्रंश आणि प्राकृत मराठीचा इतिहास नव्याने लिहिणे गरजेचे आहे. ते काम संशोधक विद्यार्थ्यांनी करावे', असे आवाहन प्रा. डॉ. गोमटेश्वर पाटील यांनी केले.

अभिजात मराठी भाषा सप्ताहानिमित्त शिवाजी विद्यापीठातील मराठी अधिविभागातर्फे 'अभिजात मराठी भाषा' या विषयावर आयोजित मार्गदर्शनपर कार्यक्रमात ते बोलत होते. अध्यक्षस्थानी मराठी विभागप्रमुख प्रा. डॉ. रणधीर शिंदे होते.

महाराष्ट्री अपभ्रंश भाषेतून अभिजात मराठी भाषेचा मागोवा घेता येतो. तसेच मराठीच्या पूर्वपरंपराही शोधता येत असल्याचे प्रा. पाटील यांनी सांगितले.

डॉ. अनिल गवळी यांनी मराठी ही काळाच्या कसोटीवर टिकणारी भाषा असल्याने मराठीला अभिजात दर्जा मिळाला. बहुभाषिक देशात भाषांना अनन्यसाधारण महत्त्व असते. भाषा या समाजाचे सांस्कृतिक संचित असतात. त्यामुळे आज भाषा टिकवणे हे खूप मोठे आव्हान असल्याचे त्यांनी सांगितले.

मराठीला मोठा इतिहास आणि समृद्ध परंपरा असल्याचे प्रा. शिंदे यांनी सांगितले. प्रा. डॉ. नंदकुमार मोरे यांनी परिचय करून दिला. स्मिता राजमाने यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. सुखदेव एकल यांनी आभार मानले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
11 OCT 2025
पुढारी

# मानसिक आरोग्यासाठी संवाद, समज आणि सहकार्य हवे : देसाई

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

संवाद, समज आणि सहकार्य आदींद्वारे मानसिक आरोग्य जपता येते, असे प्रतिपादन मानसशास्त्र समुपदेशक सत्यजित देसाई यांनी केले.

करिअर गाईडन्स अँड सायकॉलॉजिकल कौन्सिलिंग सेंटर, आरोग्य विभाग आणि मानसशास्त्र विभागाच्या संयुक्त विद्यमाने जागतिक मानसिक आरोग्य दिनानिमित्त शिवाजी विद्यापीठाच्या मास कम्युनिकेशन विभागात विशेष कार्यक्रमाचे आयोजन केले होते. यावेळी देसाई म्हणाले, अलीकडच्या काळात तरुणांमध्ये नैराश्य, उदासीनतेचे प्रमाण वाढत चालले आहे. त्यासाठी निरोगी आहार, पुरेसा आराम, जीवनशैलीत बदल, कुटुंब व मित्रांसोबत मजबूत नातेसंबंध निर्माण करणे आवश्यक आहे. योगधारणा करणेदेखील तितकेच महत्त्वाचे आहे. यामुळे नैराश्य कमी होण्यास मदत होते. यावेळी मानसशास्त्र विभागातील विद्यार्थ्यांनी ताण कमी करण्यासाठी माईंड फुलनेस, सायमन सेज यांसारखे उपक्रम घेतले. उपक्रमामध्ये मानसशास्त्र विभागाचे विद्यार्थी अमृत सोळंकी, अमृत सूट, सोनू गोरल, अनुजा सुतार, किशोरी सुतार, पूर्वा शिंदे यांनी सहभाग घेतला. डॉ. सुमेधा साळुंखे यांनी स्वागत केले. ज्ञानदा पोवार यांनी आभार मानले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
11 OCT 2025
सकाळ

# दोनपेक्षा अधिक भाषांवर विद्यार्थ्यांचे प्रभुत्व असावे

## अमरदीप कुलश्रेष्ठी : विद्यापीठात 'हिंदी पखवाडा'

कोल्हापूर, ता. १० : 'हिंदी जगामध्ये बोलली जाणारी दुसऱ्या क्रमांकाची भाषा आहे. या भाषेच्या माध्यमातून अनुवाद, राजभाषा अधिकारी यांसह विविध क्षेत्रांमध्ये अनेक रोजगाराच्या संधी उपलब्ध आहेत. यासाठी भाषेच्या विद्यार्थ्यांचे दोनपेक्षा अधिक भाषांवर प्रभुत्व असले पाहिजे', असे प्रतिपादन युको बँकेचे पुणे येथील राजभाषा अधिकारी अमरदीप कुलश्रेष्ठी यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाच्या हिंदी विभागामध्ये 'हिंदी पखवाडा' समारोप आणि विविध स्पर्धांचा बक्षीस वितरण कार्यक्रमात ते बोलत होते. अध्यक्षस्थानी हिंदी अधिविभागप्रमुख डॉ. तृप्ती करेकट्टी, तर आजरा महाविद्यालयाचे डॉ. अशोक बाचूळकर प्रमुख उपस्थित होते.

'भाषा मानवी समाजाला जोडते. मात्र जपून वापर न केल्यास ती तोडूही शकते. साहित्यिकांनी नवसंजीवनीची घुटी समाजाला दिली पाहिजे', असे डॉ. बाचूळकर यांनी सांगितले.